पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांचेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या **"अभिलेख व्यवस्थापन शास्त्र"** या प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजनास व खर्चास कायम स्वरुपी मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : मपुवि २०१७/प्र.क्र.५९/सां.का.२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ डिसेंबर ,२०२१.

वाचा: १.संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचे पत्र
क्रमांक: अव्यशा/२०१९/५२ दि. २ जानेवारी, २०२०.
२. शासन पत्र क्रमांक : मपूवि-२०१७/प्र.क्र.५९/सां.का.२,
दि. १४ ऑगस्ट, २०२०,
३. संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचे पत्र
क्रमांक : जा.क्र.पुरा.संचा/अव्यशा/कामा/२०२१/१२९९
दि. २१ जून, २०२१.

<u>प्रस्तावना</u> : पुराभिलेख संचालनालयाच्या संदर्भ क्र. १ येथील पत्रास अनुसरुन शासनाच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये पुराभिलेख संचालनालयास " अभिलेख व्यवस्थापन शास्त्र" या विषयावर प्रत्येक महसूली विभागात एक या प्रमाणे सहा महसूली विभागात सहा कार्यशाळा आयोजित करण्यास, तसेच प्रत्येक महसूली विभागातील जिल्हास्तरावर संबंधित जिल्हयातील सर्व कार्यालयांसाठी चक्रिय पध्दतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यास विशिष्ट अटींवर मान्यता देण्यात आली आहे. आता सदर मान्यता पत्र स्वरुपात न देता शासन निर्णयाच्या स्वरुपात देण्यात यावी, अशी विनंती संचालक, पुराभिलेख संचालनालय यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये शासनास केली आहे. त्यानुसार या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- पुराभिलेख संचालनालयास " अभिलेख व्यवस्थापन शास्त्र" या विषयावर प्रत्येक महसूली विभागात एक या प्रमाणे सहा महसूली विभागात सहा कार्यशाळा आयोजित करण्यास, तसेच प्रत्येक महसूली विभागातील जिल्हास्तरावर संबंधित जिल्हयातील सर्व कार्यालयांसाठी चक्रिय पध्दतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यास खालील अटींवर कायमस्वरुपी मान्यता देण्यात येत आहे :-

१) प्रशिक्षण अभ्यासक्रमाची आखणी व त्यासाठी आवश्यक असलेले साहित्य शासकीय अधिनियम, नियम व कार्यपध्दतीनुसार असेल याची संचालकांनी खात्री करुन घ्यावी.

२) प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षकांची निवड करताना त्यांना अभिलेख व्यवस्थापनाबाबत शासकीय नियम कार्यपध्दतीची माहिती व अनुभव असल्याची संचालकांनी खात्री करुन घ्यावी.

३) संचालनालय सदर खर्च कार्यालयीन खर्चाच्या तरतूदीमधून करणार असल्याने त्यासाठी विहित वित्तीय व खरेदीविषयक नियमांचे पालन करण्यात यावे.

४) प्रशिक्षण कार्यशाळेच्या खर्चाची मर्यादा कार्यशाळा रुपये ३०,०००/- वरुन रु. ६०,०००/- (अक्षरी रुपये साठ हजार फक्त) इतकी करण्यात येत आहे.

५) प्रस्तुत प्रशिक्षण कार्यशाळेनंतर संबंधित कार्यालयात त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घ्यावा व या कार्यशाळेच्या फलश्रुतीचा अहवाल शासनास सादर करावा.

२. याबाबतचा खर्च "मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला आणि संस्कृती (००) १०४, पुराभिलेख (०१) (०२) पुराभिलेख कार्यालये (२२०५ १७९५) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षात उपलब्ध करण्यात आलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र.वि.अ.प.-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग दोन, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-एक, उप विभाग-तीन अ.क्र.४, परिच्छेद २७ (२) (अ) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.दि.पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, मुंबई, पुराभिलेख संचालनालय.
२. महालेखापाल,महाराष्ट्र-१(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव (अर्थसंकल्प) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. निवड नस्ती सां.का.२